

# मतमोजणीसाठी अंतिम तयारी पूर्ण

## आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्याकडून पाहणी





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )**- अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी नवसारी येथील मतमोजणी केंद्राचे निरीक्षण केले.

आयुक्तांनी या दौर्‍यादरम्यान मतमोजणी कक्ष, स्ट्राँग रूम, मीडिया सेंटर, सुरक्षा व्यवस्था, प्रवेशङ्कनिर्गमन मार्ग, वाहतूक व पार्किंग नियोजन, तसेच आपत्कालीन सेवा यांचा सविस्तर आढावा घेतला. मतमोजणी केंद्रात येणार्‍या अधिकारी, कर्मचारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी व इतर अधिकृत व्यक्तींसाठी स्वतंत्र प्रवेश व निर्गमन गेट ठेवण्यात आले असून, गर्दी व गोंधळ टाळण्यासाठी नियोजनबद्ध व्यवस्था करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सातही झोनसाठी स्वतंत्र मतमोजणी कक्ष तयार करण्यात आले असून प्रत्येक झोनचा निकाल स्वतंत्रपणे आणि अचूकरीत्या मांडता यावा यासाठी अत्याधुनिक व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणीदरम्यान निकाल थेट एलईडी स्क्रीनवर प्रदर्शित होणार असून, नागरिक व माध्यम प्रतिनिधींना त्वरित व पारदर्शक माहिती उपलब्ध होणार आहे.

मतपेट्या व ईव्हीएम सुरक्षित ठेवण्यासाठी स्ट्राँग रूममध्ये बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. सीसीटीव्ही देखरेख, पोलीस बंदोबस्त व प्रवेश नियंत्रण प्रणालीमुळे कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये याची दक्षता घेतली जात आहे. तसेच उमेदवारांचे प्रतिनिधी व एजंट यांच्यासाठी स्वतंत्र, सुव्यवस्थित बसण्याची व निरीक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे.

माध्यम प्रतिनिधींकरिता सुसज्ज मीडिया सेंटर उभारण्यात आले असून, त्याठिकाणी इंटरनेट, वीजपुरवठा, माहिती फलक व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. 15 व 16 जानेवारी 2026 रोजी होणार्‍या मतमोजणीदरम्यान पत्रकारांना निकालांची माहिती वेळेवर मिळावी, यासाठी स्वतंत्र समन्वय यंत्रणा कार्यरत राहणार आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणा, होमगार्ड व सुरक्षा कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. याशिवाय वीजपुरवठा, स्वच्छता, अग्निशमन सेवा, रुग्णवाहिका व वैद्यकीय सुविधा या सर्व बाबींचेही विशेष नियोजन करण्यात आले आहे.

आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी पत्रकारांशी संवाद साधत सांगितले की, मतमोजणीची प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि तत्परतेने पार पडावी यासाठी सर्व व्यवस्थांची काळजी घेतली गेली आहे. उद्या गुरुवार, 15 जानेवारी 2026 आणि दिनांक 16 जानेवारी 2026 रोजी सातही झोनमध्ये मतमोजणी सुरू होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

### पहिल्या पोलींग पार्टीचे स्वागत

मतदान संपल्यानंतर ईव्हीएम व संबंधित साहित्य घेऊन पोलींग पार्ट्यांनी मुख्यालयाकडे परतीचा प्रवास सुरू केला. या पार्श्वभूमीवर झोन क्रमांक 4 मधील पोलींग पार्टी सर्वप्रथम मुख्यालयात दाखल झाली. प्रशासनाच्या वतीने त्यांच्या सुरक्षित आगमनाचे औपचारिक स्वागत करण्यात आले. मतदानादरम्यान पोलीस बंदोबस्त आणि कर्मचाऱ्यांची तत्परता यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडला नाही. मुख्यालयात पोहोचल्यावर ईव्हीएम मशीनची तपासणी, नोंदणी आणि सुरक्षित कक्षात ठेवण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली. वरिष्ठ अधिकारी, पोलीस आणि निवडणूक कर्मचाऱ्यांची उपस्थिती सुनिश्चित होती. उर्वरित झोनमधील पोलींग पार्ट्यांचे आगमनही टप्प्याटप्प्याने सुरू असून, सर्व मशीन सुरक्षितपणे जमा करून मतमोजणीसाठी तयारी केली जात आहे. पहिली पोलींग पार्टी सुखरूप पोहोचल्याने निवडणूक यंत्रणेवरचा ताण कमी झाला असून, शहरातील राजकीय वातावरणात उत्सुकता अधिक वाढली आहे.

# ईव्हीएममध्ये 53.65 टक्के मतदान

- बॅलेटची आकडेवारी रात्री उशिरापर्यंत येणे बाकी
- एकत्रीत 55 टक्क्यांपर्यंत मतदानाची शक्यता
- 661 उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत; आज निकाल होणार















**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )** - अमरावती महानगरपालिकेच्या 22 प्रभागांतील 87 जागांसाठी गुरुवारी (दि. 15) मतदान सुरळीत पार पडले. शहरातील 231 इमारतींमध्ये उभारलेल्या 805 मतदान केंद्रांवर सकाळी 7.30 पासून सायंकाळी 5.30 पर्यंत मतदान झाले. इव्हीएमच्या प्राप्त अंतिम आकडे 53.65 टक्के मतदान झाल्याचे चित्र दिसून आले. प्रशासनाने मतदान सुरळीत पार पडावे यासाठी व्यापक तयारी केली होती. सात निवडणूक झोन कार्यालयांमध्ये प्रत्येक केंद्रावर मतदान केंद्राध्यक्ष, तीन मतदान अधिकारी आणि पोलीस कर्मचारी या पाच जणांचे पथक कार्यरत होते. एकूण 4,500 अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाले. सन 2017 मध्ये हे मतदान 54.54 टक्के झाले होते. रात्री उशिरापर्यंत बॅलेटची आकडेवारी बाकी असल्याने यंदाही जवळपास 55 टक्क्यांपर्यत मतदान झाले असल्याची शक्यता आहे.

### सकाळी संथ, दुपारी उत्साहवर्धक

सकाळच्या तासांत मतदानाचा वेग काहीसा मंद होता. पहिल्या दोन तासांत 24,437 पुरुष आणि 19,940 महिलांनी मतदान केले. दुसऱ्या टप्प्यात सकाळी 11.30 वाजेपर्यंत एकूण मतदान टक्केवारी 17.1 टक्के झाली. दुपारनंतर मतदान केंद्रांवर गर्दी वाढली. कामावरून मोकळे होणारे मतदार, महिला व तरुण वर्ग मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडले. दुपारी 3.30 वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी 40.62 पर्यंत पोहोचली. मतदान प्रक्रिया कोणत्याही अनुचित प्रकाराविना शांततेत पार पडली. शहरातील नागरिकांनी संयम राखून मतदानाचा हक्क बजावला. अनेक प्रभागांत 45 ते 50 टक्के मतदान झाल्याने प्रशासनाने समाधान व्यक्त केले. आज मतमोजणीसह निकाल सार्वजनिक होणार आहे, ज्याकडे सर्व राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.

### सकाळी संथ, दुपारी उत्साही

सकाळी 7.30-9.30 : 24,437 पुरुष, 19,940 महिला
सकाळी 11.30 : मतदान टक्केवारी 17.1 %
दुपारी 1.30 : मतदान टक्केवारी 27.89 %
दुपारी 3.30 : मतदान टक्केवारी 40.62 %













# दत्तापूर पोलीस ठाणेदारावर गंभीर आरोप

**महासागर प्रतिनिधी**

धामणगाव रेल्वे, (दि. 15)- धामणगाव रेल्वे तालुक्यातील दत्तापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार गिरीश ताथोड यांच्याविरोधात गंभीर मानवाधिकार उल्लंघनाचे आरोप करण्यात आले आहेत. येथील रहिवासी सागर गोरखनाथ शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे लेखी तक्रार दाखल करून न्यायाची मागणी केली आहे.

**राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार**

तक्रारीनुसार, कर्तव्यावर असताना ठाणेदारांनी शिंदे यांच्याशी फोनवरून अत्यंत अश्लील, अपमानास्पद व धमकीसदृश भाषा वापरली. आई-बहिणींवरून शिवीगाळ करत नागरिकाच्या सन्मान, प्रतिष्ठा व मानसिक सुरक्षिततेचा गंभीर भंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वर्तनामुळे शिंदे व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक त्रास सहन करावा लागल्याचे नमूद आहे. तसेच, कुटुंबाला मिळालेल्या धमक्यांबाबत दखलपात्र गुन्हा असूनही स्नङ्कक्र नोंदविण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप आहे. हे कृत्य क्र्रह्लस्/ष्टह्लक्क्ष्ट कलम 154 तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या ललिता कुमारी विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या निर्णयाचे उल्लंघन असल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात तीव्र चर्चा सुरू असून पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# निकालापूर्वीची उत्कंठा, धाकधूक शिगेला

## महिलांचा कौल ठरणार सत्तेची किल्ली | अपक्षांची भूमिका आणि बहुकोनी लढतींमुळे निकालाबाबत प्रचंड उत्सुकता

















**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )** - तब्बल आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आणि तीन वर्षांच्या प्रशासकीय राजवटीनंतर अमरावती महानगरपालिकेसाठी पार पडलेल्या मतदानानंतर आता सर्वच राजकीय पक्षांची नजर मतमोजणीकडे लागली आहे. एकूण 59.62 टक्के मतदान झाल्याने ही निवडणूक मागील निवडणुकीच्या तुलनेत अधिक उत्साहवर्धक ठरली आहे. मात्र या मतदानाचा कौल नेमका कोणाच्या बाजूने झुकणार, याबाबत राजकीय वर्तुळात कमालीची धाकधूक आहे.

यंदा एकूण 661 उमेदवार रिंगणात उतरल्याने अनेक प्रभागांत बहुकोनी लढती झाल्या आहेत. त्यामुळे अगदी काही मतांच्या फरकावरही विजय-पराजय ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषत: अपक्ष उमेदवारांची संख्या अधिक असल्याने पारंपरिक राजकीय पक्षांचे गणित बिघडण्याची चिन्हे आहेत.

### निकाल ठरविणारे निर्णायक घटक

महिलांचा वाढलेला मतदान सहभाग
अपक्ष उमेदवारांची भूमिका
प्रभागनिहाय मतांचे विभाजन

### मतदानाचे ठळक आकडे

दुपारी 1.30 वाजेपर्यंत : 27.89 %
दुपारी 3.30 वाजेपर्यंत : 40.62 %
एकूण उमेदवार : 661

### मतदानाचा वेग आणि बदलता ट्रेंड

सकाळी 7.30 वाजता मतदानास सुरुवात झाली असली तरी सुरुवातीचे काही तास मतदान संथ राहिले. दुपारी 1.30 वाजेपर्यंत केवळ 27.89 टक्के मतदान झाले होते. मात्र दुपारनंतर परिस्थिती बदलली. दुपारी 3.30 वाजेपर्यंत मतदान 40.62 टक्क्यांवर पोहोचले. शेवटच्या टप्प्यात शहरी कामगार वर्ग, नोकरीपेशा, तरुण आणि व्यावसायिक मतदार मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्याचे चित्र दिसून आले.

### महिलांचा सहभाग ठरतोय निर्णायक

यंदाच्या निवडणुकीत महिलांचा सहभाग अत्यंत उल्लेखनीय ठरला. साईनगर-अकोली, अलीम नगर-रहेमत नगर, जमील कॉलनी-लालखडी, नवसारी आणि जुनी वस्ती बडनेरा या भागांत महिलांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केले. राजकीय जाणकारांच्या मते, महिलांचा कौल पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, सुरक्षितता आणि नागरी सुविधांवर आधारित असतो. त्यामुळे या मुद्द्यांवर काम करणाऱ्या उमेदवारांना त्याचा मोठा लाभ होऊ शकतो.

### मुस्लिमबहुल भागांत उत्स्फूर्त प्रतिसाद

जमील कॉलनी, छायानगर, लालखडीसह मुस्लिमबहुल भागांत सकाळपासूनच मतदानाचा उत्साह दिसून आला. मतदान केंद्रांवर दिवसभर महिला-पुरुषांच्या रांगा लागलेल्या होत्या. इतर काही भागांत मतदानाचा वेग कमी असतानाही या परिसरात सातत्याने मतदान होत असल्याचे चित्र होते.

### मतदार यादी आणि ईव्हीएममुळे गोंधळ

निवडणुकीदरम्यान मतदार यादीतील गंभीर त्रुटी समोर आल्या. एकाच कुटुंबातील सदस्यांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रांवर आढळली, तर काहींची नावे यादीतच सापडली नाहीत. महापालिकेच्या मोबाईल अॅपवर चुकीची माहिती दिसत असल्याच्या तक्रारी झाल्या. अनेक मतदारांपर्यंत मतदार पावत्या पोहोचल्या नसल्याने गोंधळ वाढला. काही मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन बिघाडाचे प्रकार घडले. प्रभाग क्रमांक 2 आणि 17 मध्ये ईव्हीएम अचानक बंद पडल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले. काही ठिकाणी यंत्रांची मांडणी अ, ब, क, ड ऐवजी ड, क, ब, अ अशा उलट्या क्रमाने असल्याचा आरोप झाला. यावर शिवसेना (शिंदे गट) नेते अभिजीत अडसूळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत दोषींवर कारवाईची मागणी केली.

# वीज वितरण कंपनीचा स्मार्ट मीटर लावण्याचा नवा फंडा

## मीटर सुरू असतानाही 'फॉल्टी'चा बहाणा | नागरिकांमध्ये संतापाची लाट



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.15 )** – अंजनगाव सुर्जी तालुक्यात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून स्मार्ट मीटर बसविण्यासाठी नवा फंडा अवलंबला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. सुरू असलेले आणि सुरळीत चालणारे मीटर 'फॉल्टी' असल्याचे कारण देत खासगी कंपनीच्या माध्यमातून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविण्याचा सपाटा सुरू असल्याने शहरासह तालुक्यात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

महावितरणने स्मार्ट मीटर बसविण्याचे काम एका खासगी कंपनीला दिले आहे. या कंपनीचे कर्मचारी भरदुपारी घरोघरी व दुकानदारांकडे जाऊन तुमचे नाव आमच्या यादीत आहे, मीटर फॉल्टी आहे, तो त्वरित बदलणे आवश्यक आहे, असे सांगत स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न करीत आहेत. विशेषत: घरात पुरुष सदस्य नसताना महिलांना दबावात घेऊन ही कारवाई केली जात असल्याचे प्रकार उघडकीस येत आहेत.

असाच प्रकार गणेश नगर परिसरात घडला. एका कुटुंबाला मीटर फॉल्टी असल्याचे सांगण्यात आले. मात्र संबंधित कुटुंबीयांनी मीटर सुरळीत सुरू असून नियमित वीजबिल भरत असल्याचा पुरावा दाखवताच कर्मचारी माघार घेत काढता पाय घेऊन निघून गेला. अशा घटना शहरात सर्रास घडत असल्याने नागरिकांमध्ये संशय व असंतोष वाढत आहे.

### घरमालक घरी नसताना फिटींग

गोरगरीब, अशिक्षित नागरिक, शेतकरी व शेतमजूर दिवसभर कामासाठी बाहेर असतात, त्याच वेळेत त्यांच्या घरांमध्ये अशा प्रकारे स्मार्ट मीटर बसविले( फिटींग) जात असल्याचा आरोप होत आहे. यापूर्वी ग्राहकांच्या परवानगीशिवाय स्मार्ट मीटर बसविले जाणार नाही, असे आश्वासन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिले होते. मात्र प्रत्यक्षात मीटर सुस्थितीत असतानाही फॉल्टी चा ठपका ठेवून बदल करण्याचा प्रकार सुरू असल्याने नागरिकांत प्रचंड रोष आहे. या प्रकरणाकडे लोकप्रतिनिधींनी व महावितरण प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन चौकशी करावी व ग्राहकांच्या संमतीशिवाय कोणतीही कारवाई होणार नाही, याची ठोस अंमलबजावणी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# मेळघाटात बालविवाह रोखण्यासाठी पोलिस पाटलांची पुढाकाराची भूमिका


## रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरांमध्ये जनजागृती

**संतोष भालेराव**
**परतवाडा, ( दि.15 )**– मेळघाट परिसरात बालविवाहास प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हाधिकारी अमरावती व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांच्या आदेशानुसार तसेच पोलिस स्टेशन चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखाली चांदपुर (ता. चिखलदरा) येथील पोलिस पाटील सुधीर मातु जामुनकर यांनी प्रत्यक्ष कृतीतून प्रभावी जनजागृती उपक्रम राबविला. टेंब्रुसोंडा ग्रामपंचायत हद्दीतील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या सुरू असलेल्या कामाच्या ठिकाणी मोठ्या संख्येने मजूर उपस्थित होते. त्या ठिकाणी भेट देत पोलिस पाटील जामुनकर यांनी मजुरांशी थेट संवाद साधला. त्यांनी बालविवाहाचे दुष्परिणाम, त्यावरील कायदेशीर तरतुदी, शिक्षणाचे महत्त्व तसेच बालविवाह रोखण्यात नागरिकांची जबाबदारी याबाबत सविस्तर माहिती दिली.



बालविवाह हा कायद्याने गंभीर गुन्हा असून त्यात सहभागी किंवा सहकार्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षित भविष्य यासाठी पालकांनी सजग व जबाबदार भूमिका घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. बालविवाहाची माहिती मिळाल्यास त्वरित प्रशासन, पोलिस पाटील, ग्रामसेवक किंवा संबंधित यंत्रणेला कळवावे, असेही त्यांनी सांगितले.

या जनजागृती कार्यक्रमाला चांदपुर गावातील गणमान्य नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळघाटासारख्या दुर्गम व आदिवासीबहुल भागात रोजगार हमीच्या कामाच्या ठिकाणी थेट जनतेशी संवाद साधण्याची ही पद्धत प्रभावी ठरत असून, प्रशासनाच्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी आणि सामाजिक जबाबदारीचे हे उत्तम उदाहरण असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.



# बी.डी.एस. हायस्कूल येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.15 )**– श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अतुल ठाकरे होते, तर सुषमा देशमुख, एस. व्ही. पाटील व पवन देशमुख हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन व हारार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कार्यक्रम संयोजक योगेश कोठाळे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर भाषणे सादर केली. प्रमुख वक्त्या राधा जुमडे हिने मी जिजाऊ बोलते हे एकपात्री नाट्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. नम्रता वाकेकर हिने स्वामी विवेकानंद यांच्या विचारधारेवर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात डॉ. अतुल ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रिया धने हिने केले, तर आभार तन्वी भोयर हिने मानले.

# ई-पिक पाहणीस शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद

### 24 जानेवारीपर्यंत नोंदणीची अंतिम मुदत

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि. 15 )** – महसूल विभागाच्या वतीने रब्बी हंगामासाठी राबविण्यात येत असलेल्या ई-पिक पाहणी मोहिमेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नोंदणी वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. ही मोहीम 10 डिसेंबर 2025 पासून सुरू झाली असून 24 जानेवारी 2026 ही पिक पाहणी नोंदणीची अंतिम मुदत आहे.




या मोहिमेंतर्गत शेतकऱ्यांनी स्वत:च्या अँड्रॉइड मोबाईलद्वारे आपल्या 7/12 उताऱ्यावर पिक पेरणीची ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी 'ई-पिक पाहणी 4.05' हे मोबाईल ॲप वापरावे लागते. सदर ॲप गुगल प्ले-स्टोअरवर उपलब्ध असून शेतावर जाऊन प्रत्यक्ष पिकाची पाहणी करून माहिती अपलोड करणे बंधनकारक आहे. महसूल प्रशासनाच्या माहितीनुसार, ई-पिक पाहणीद्वारे नोंदणी न केल्यास संबंधित शेतजमिनीवरील 7/12 उताऱ्यावर पिक पेरा कोरा राहणार आहे. ही नोंद नंतर दुरुस्त करता येणार नसल्याने पिक विमा, नुकसान भरपाई तसेच इतर शासकीय योजनांचे लाभ धोक्यात येऊ शकतात. विशेषत: अवेळी पाऊस, दुष्काळ, गारपीट किंवा इतर नैसर्गिक आपत्ती आल्यास पिक विमा मिळण्यासाठी 7/12 वर अचूक पिक नोंद असणे अत्यंत आवश्यक आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन नाही किंवा मोबाईल वापरण्यात अडचण येत आहे, त्यांच्यासाठी गावचे तलाठी, कोतवाल, नियुक्त सहाय्यक, कॉमन सर्व्हिस सेंटर तसेच डीसीएससाठी नियुक्त कर्मचारी यांच्या माध्यमातून नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अनेक गावांत शेतकऱ्यांनी स्वत: पुढाकार घेत ई-पिक पाहणी पूर्ण केल्याने या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अंतिम तारखेची वाट न पाहता 24 जानेवारी 2026 पूर्वी सर्व शेतकऱ्यांनी आपली पिक नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन महसूल प्रशासनाने केले आहे.




# राज्य क्रीडा दिन उत्साहात

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, ( दि.15 )**– ऑलिम्पिक विजेते आणि भारताच्या क्रीडा इतिहासातील सुवर्णपान ठरलेले थोर कुस्तीपटू खाशाबा जाधव यांची जयंती राज्य क्रीडा दिन म्हणून स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी, क्रीडा शिक्षक विजय तारापुरे, अजय हिवसे व सुहास मोरे उपस्थित होते. क्रीडा शिक्षक सुहास मोरे यांनी खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. प्रतिकूल परिस्थितीत जिद्द, मेहनत व आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवून देशाचे नाव उज्ज्वल केल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले. राज्य क्रीडा दिनानिमित्त शाळेत विविध क्रीडा स्पर्धा, प्रात्यक्षिके, व्यायाम सत्रे व प्रेरणादायी भाषणे आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून क्रीडाप्रेम व शिस्तीचे दर्शन घडवले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खेळाकडे करिअर म्हणून पाहण्याची दृष्टी देत राष्ट्रसेवेसाठी क्रीडा क्षेत्रातून योगदान देण्याची प्रेरणा देण्यात आली.



# वरूड नगर परिषदेत उपाध्यक्षपदी कविता उपरकर यांची निवड


## भाजपचे तीन स्वीकृत नगरसेवक

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड,( दि.15 )**– नगर परिषदेमध्ये बुधवारी दुपारी एक वाजता झालेल्या विशेष सभेत उपाध्यक्षपदी भाजपच्या कविता नरेंद्र उपरकर यांची निवड करण्यात आली. तसेच स्वीकृत नगरसेवकपदी योगेश्वर खासबागे, राहुल आगरकर आणि प्रवीण सावरकर यांची निवड झाली. या सभेला पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष ईश्वर सलामे, मुख्याधिकारी गजानन भोयर उपस्थित होते. वरूड नगर परिषदेत एकूण 26 नगरसेवक असून त्यामध्ये भाजप 18, अपक्ष 1, प्रहार 1, काँग्रेस 2 आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.) 4 असे संख्याबळ आहे. भाजप, अपक्ष, प्रहार व काँग्रेस अशा 22 सदस्यांचा गट जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने स्थापन झाल्याने तीन स्वीकृत नगरसेवकपदांवर भाजपच्या उमेदवारांची निवड निश्चित झाली. त्यामुळे विरोधकांना स्वीकृत सदस्य निवडीत संधी मिळाली नाही. राष्ट्रवादीकडे चार नगरसेवक असले तरी अपक्ष, प्रहार व काँग्रेस यांनी भाजपाला पाठिंबा दिल्याने त्यांचा प्रयत्न अपयशी ठरला. आ. चंदू उर्फ उमेश यावलकर यांच्या रणनीतीमुळे भाजपला पुन्हा एकदा राजकीय यश मिळाल्याचे चित्र दिसून आले.

# जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात अस्वच्छतेचा कहर

## प्राचार्यांचे दुर्लक्ष, विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर प्रश्नचिन्ह

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.15 )** – दर्यापूर येथील जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयातील वर्गखोल्यांमध्ये साचलेल्या कचऱ्यामुळे व अस्वच्छतेमुळे प्रशासनावर तीव्र टीका होत आहे. काही वर्गखोल्यांमध्ये कागद, प्लास्टिक पिशव्या, धूळ-मळ यांचा साठा दिसून येत असून विद्यार्थ्यांना बसण्यासाठीही अडचणी निर्माण होत आहेत. शिक्षणाचे मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाविद्यालयातच अशी अवस्था असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



दुर्गंधी, माशा व डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. मात्र, भीतीपोटी अनेक विद्यार्थी तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. नियमित स्वच्छता, कचरावर्गीकरण, तसेच वर्गखोल्या व स्वच्छतागृहांची दैनंदिन साफसफाई याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये आहे. महाविद्यालय प्रशासनाने, विशेषत: प्राचार्यांनी या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी विद्यार्थी व पालकांनी केली आहे. स्वच्छ व आरोग्यदायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी उच्च शिक्षण विभागानेही याची दखल घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राप्टरने मारहाण करून जखमी

**अमरावती** – मंगरूळ दस्तगीर पोलिस ठाणे हद्दीतील चिंचोली येथील निलेश सुखदेवराव अवध (वय 40) याच्याशी वाद घालून लखन दिलीप अडकणे (वय 24) याने राप्टरने हल्ला करून त्याला जखमी केले. निलेशच्या तक्रारीवरून पोलिसांनी लखनविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास मंगरूळ दस्तगिर पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहे.

# इतवारा बाजारात चाकूसह तरुण अटकेत

**अमरावती.** नागपुरी गेट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील इतवारा बाजार परिसरातील लोहा बाजारात पोलिसांनी कारवाई करत आरोपी वसीम खान उर्फ कोब्रा आसिफ खान याच्याकडून चाकू जप्त केला. या प्रकरणी पोलिसांनी सोमवारी आरोपीविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास नागपुरी गेट पोलिस करीत आहेत.

# मुलावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या वडिलांना जन्मठेप

### शेतीच्या वादातून झालेल्या हत्येप्रकरणी सेशन कोर्टाचा कठोर निकाल

**महासागर प्रतिनिधी**
**वरूड, ( दि.15 )**– मुलावर भाल्याच्या पात्याने प्राणघातक हल्ला करून त्याची हत्या केल्याप्रकरणी दिलीप भाऊराव पाचपोर (वय 71, रा. खडका, ता. वरूड, जि. अमरावती) यांना सेशन कोर्टाने जन्मठेप व सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. तसेच एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास दोन वर्षांची अतिरिक्त सक्तमजुरी भोगावी लागणार आहे. दंडाची रक्कम पीडित दिनेशच्या आईस देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. आरोपी व फिर्यादी हे पती-पत्नी असून कौटुंबिक वादामुळे फिर्यादी पत्नी गर्भवती असताना माहेरी राहत होती. मुलगा दिनेश हा वारस असल्याने ग्राम खडका येथील शेती त्याच्या नावावर करण्यावरून वाद निर्माण झाला होता. दिनांक 24 नोव्हेंबर 2020 रोजी दिनेश शेतात गेला असता आरोपीने त्याच्या गळ्यावर भाल्याच्या पात्याने वार करून गंभीर जखमी केले. रक्तस्त्राव होत असतानाच तो बारगाव बसस्थानकावर पोहोचला. ग्रामस्थांनी मदत करून त्याला रुग्णालयात दाखल केले, मात्र पुढील उपचारासाठी नागपूर येथे नेत असताना त्याचा मृत्यू झाला. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद सरकटे व त्यांच्या पथकाने केला. सेशन कोर्ट वरूड येथील माननीय न्यायमूर्ती ए. ए. पंचभाई यांनी सर्व पुरावे व साक्षीदार तपासून आरोपीला दोषी ठरवत ही कठोर शिक्षा सुनावली.

# ग्रामीण भागात सोशल मिडियातून वाढती फसवणूक

## शेतकरी, महिला व ज्येष्ठ नागरिक सायबर गुन्ह्यांचे बळी

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.15 )**– ग्रामीण भागात सोशल मिडियाचा वाढता वापर जितका फायदेशीर ठरत आहे, तितकाच तो धोकादायकही ठरत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांसारख्या माध्यमांवरून होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून ग्रामीण नागरिक याचे मुख्य बळी ठरत आहेत. आकर्षक जाहिराती, बनावट सरकारी योजना, लॉटरी




लागल्याचे आमिष, तसेच कमी गुंतवणुकीत जास्त नफ्याचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक लूट केली जात आहे.

विशेषत: शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवक, महिला व ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य केले जात आहे. डिजिटल व्यवहारांची पुरेशी माहिती नसल्याचा गैरफायदा घेत गुन्हेगार अनोळखी कॉल्स व मेसेजद्वारे बँक खात्याची माहिती, एटीएम क्रमांक व ओटीपी मागवतात. काही मिनिटांतच खात्यातील रक्कम गायब झाल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. काही ठिकाणी बनावट कर्जमाफी, अनुदान, शिष्यवृत्ती व प्रधानमंत्री योजनांच्या नावानेही फसवणूक केली जात आहे.

ग्रामीण भागात सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृतीचा अभाव असल्याने अनेकजण सहजपणे या जाळ्यात अडकतात. फसवणूक झाल्यानंतरही लाज किंवा भीतीपोटी अनेक नागरिक तक्रार नोंदवत नाहीत, त्यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढत आहे.

### सतर्क रहावे!

पोलीस प्रशासनाकडून अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, संशयास्पद कॉल्सना प्रतिसाद देऊ नये, ओटीपी व बँक माहिती कुणालाही देऊ नये, तसेच फसवणूक झाल्यास तात्काळ पोलीस ठाणे किंवा सायबर हेल्पलाईनवर तक्रार करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. सोशल मिडिया उपयुक्त असला तरी अति विश्वास घातक ठरू शकतो, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

# नदीपात्रातून गौण खनिजाची सर्रास चोरटी वाहतूक

## प्रशासनाचे दुर्लक्ष; रेती तस्कर होत आहेत मालामाल

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.15 )** – शहानूर नदीपात्रातून तसेच तालुक्यातील ग्रामीण भागातील नद्या व नाल्यांमधून गौण खनिजाची सर्रास बेकायदेशीर वाहतूक सुरू असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. रेती तस्कर खुलेआम ट्रॅक्टर-ट्रॉलीद्वारे रेती व इतर गौण खनिजांची वाहतूक करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ मिळवत आहेत. प्रत्येक ट्रॉलीमागे हजारो रुपयांची उलाढाल होत असल्याने तस्करीचे जाळे दिवसेंदिवस अधिक मजबूत होत आहे.

अंजनगाव-दर्यापूर, अंजनगाव-आकोट, अंजनगाव-बोराळा, अंजनगाव-टाकरखेडा, अंजनगाव-मलकापूर व अंजनगाव-वडाळी रोड या मार्गांवर मोठ्या प्रमाणात खाजगी लेआउट व बांधकाम प्रकल्प सुरू असून, त्यासाठी ही अवैध रेती वापरली जात असल्याचे दिसून येते. गौण खनिज उत्खनन व वाहतुकीसाठी प्रशासनाची परवानगी आवश्यक असतानाही कोणतीही परवानगी न घेता वाहतूक केली



जात आहे.

या बेकायदेशीर उत्खननामुळे पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत आहे. नदीपात्रातील पाणीपातळी घटणे, काठांची धूप वाढणे तसेच नैसर्गिक परिसंस्थेला धोका निर्माण होत आहे. यासोबतच शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलाठी यांनी अवैध रेती वाहतुकीविरोधात केलेल्या कारवाईचा जिल्हा प्रशासनाने सखोल आढावा घ्यावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. विनापरवाना वाहतूक करणाऱ्यांवर वाहने जप्त करून गुन्हे दाखल करावेत, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.
आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

